# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजता)

**(क)** **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा—**

**(सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) — (अनुक्रमांक १):-**

(१) **सर्वश्री प्रविण दरेकर,** प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"सहकार चळवळीमुळे राज्यात आर्थिक विकास साधला गेला असून सरकारकडून सहकाराला पाठबळ दिले जात असणे, सहकार क्षेत्रात काळानुरुप अनेक बदल होत असून विविध समस्या निर्माण होत असणे, स्वयंपुनर्विकासासाठी शासनाने सवलती दिल्या असताना पूर्ण क्षमतेने त्या लागू झाल्या नसणे, शेती, दुग्धव्यवसाय, साखर कारखाने, ग्रामीण पतपुरवठा, सूत गिरण्या, प्राथमिक कृषी सहकारी संस्था, मजूर संस्था, महिला बचत गट, मच्छिमार सहकारी संस्थांना आणखी सशक्त करण्याची आवश्यकता असणे, शंभरी पार केलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची आर्थिक स्थिती हलाखीची असणे, ई-निविदा पध्दत पारदर्शक असली तरी यातून महाराष्ट्र राज्य कंझ्युमर फेडरेशन अडचणीत आली असणे, अनेक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अडचणी आल्या असणे, अर्बन सहकारी बँकांसाठी सहाय्यभूत उपाययोजना नसणे, राज्यात मोठ्या प्रमाणात इमारती जुन्या झाल्या असून त्यांच्या पुनर्विकासाची आवश्यकता निर्माण झाली असून ही आता सतत चालणारी प्रक्रिया असणे, त्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियमात आवश्यक ते बदल करण्याची आवश्यकता असणे, सहकार टॅक्सीसारखे नाविन्यपूर्ण उपक्रम सहकारी संस्था सुरु करीत असणे, सहकारी संस्थांची झालर पांघरुन सर्वसामान्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, स्मॉल फायनान्स कंपन्यांकडून सर्वसामान्यांची होत असलेली फसवणूक, सहकार तत्वावरील प्रक्रिया उद्योग व अन्य औद्योगिक संस्थांसाठी रचनात्मक व ठोस धोरण घेण्याची गरज असणे, केंद्र सरकारच्या सहकारीता मंत्रालयातर्फे सहकारी संस्थांसाठी सुरु केलेल्या सर्व योजनांची राज्यात पूर्ण क्षमतेने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असणे, या सर्व प्रश्नांच्या बाबतीत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६, बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ व सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) — (अनुक्रमांक २):-**

(२) **सर्वश्री संजय खोडके,** विक्रम काळे, इद्रिस नायकवडी, वि.प.स. **यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"राज्यातील इतर विभागांच्या तुलनेत अमरावती विभागातील औद्योगिक स्थिती अत्यंत चिंताजनक असून, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटक आणि सूक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांची संख्या संपूर्ण राज्यात या विभागात सर्वात कमी असल्याचे दिसून येणे, हा भाग मुख्य कापूस उत्पादकपट्टा असूनही या विभागात केवळ मोजक्याच मोठ्या उद्योगांची उपस्थिती असणे, उद्योगांच्या अभावामुळे रोजगाराच्या संधीही तुलनेने खूपच कमी असणे, अमरावती येथील 'पीएम मित्र' पार्क हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा वस्त्रोद्योग प्रकल्प असणे, मात्र येथील जमिनीचे भाव अधिक असल्याने गुंतवणूकदारांमध्ये साशंकता असणे, त्यामुळे हे भाव कमी करणे गरजेचे असणे, तसेच 'पीएम मित्र' पार्कसाठी 'Project Management Consultant' (PMC) किंवा तत्सम विशेष तज्ज्ञ यंत्रणा नेमणे गरजेचे असणे, औद्योगिक वसाहतींमधील मोठ्या प्रकल्पांच्या दिरंगाईबाबत बोलायचे झाल्यास, रेमंड कंपनीला प्लांटसाठी ५०० एकर जागा देण्यात आली असून त्यापैकी केवळ ३८ एकरवर काम सुरू असणे तसेच ठरल्याप्रमाणे ३ शिफ्टमध्ये काम अद्याप सुरू न झाल्याने ते तातडीने सुरू करण्याची आवश्यकता असणे, त्याचप्रमाणे, भारत डायनॅमिक्सला ४०० एकर जागा देऊनही तो प्रकल्प अद्याप सुरू झाला नसल्याने स्थानिक विकासाचे उद्दिष्ट साध्य होण्यात अडथळे येत असणे, औद्योगिक पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी मेगा टेक्स्टाईल पार्कप्रमाणेच इतर उद्योगांसाठीही सांडपाणी प्रक्रिया पुनर्वापर प्लँट (STP/ETP) लावणे गरजेचे आहे, ज्याचा थेट फायदा तेथील इतर उद्योगांना होऊ शकणे, अमरावती विभागातून मालवाहतुकीसाठी येणारा मोठा खर्च कमी करण्यासाठी या भागात 'एक्स्पोर्ट कंटेनर डेपो टर्मिनल' उभारणे ही उद्योजकांची जुनी मागणी असणे, या सर्व बाबींचा विचार करता, अमरावती विभागाच्या औद्योगिक पुनरुज्जीवनासाठी आणि बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ व सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) — (अनुक्रमांक ३):-**

(३) **श्री. सदाशिव खोत,** श्रीमती उमा खापरे, श्री. अमित गोरखे, वि.प.स. **यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"कोकणात सध्या वानरांचा प्रचंड उपद्रव वाढला असून शेतकरी मोठ्या संकटात सापडला असणे, आंबा, केळी, नारळ, चिकू, पेरू, पपई, शेवगा तसेच विविध भाजीपाला पिकांचे दरवर्षी लाखो रुपयांचे नुकसान होत असणे, बागांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रंदिवस पहारा द्यावा लागणे, तरीही माकडे घरात घुसून नासधूस करणे, पत्रे-नळे फोडतात आणि अनेकदा लोकांच्या अंगावरही धावून येणे, या सततच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान, शारीरिक त्रास आणि मानसिक ताण सहन करावा लागत असणे, नुकसान भरपाईची प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची असल्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना न्याय मिळत नसणे, हिमाचल प्रदेशात ज्या प्रकारे वानर-माकडांना उपद्रवी प्राणी घोषित करून उपाययोजना करण्यात आल्या, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही तातडीने ठोस निर्णय घेण्याची गरज असणे, हिमाचल प्रदेशमध्ये माकडांमुळे पिकांचे मोठे नुकसान होत असल्याने राज्य सरकारने केंद्र सरकारकडे प्रस्ताव देऊन काही जिल्ह्यांमध्ये रीसस माकडांना "वर्मिन" (Vermin) म्हणून घोषित करण्याची परवानगी घेतली, ज्यामुळे त्या भागांमध्ये नियंत्रित पद्धतीने त्यांचे नियंत्रण करणे शक्य असणे, याबाबत कोकणातील शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) — (अनुक्रमांक ४):-**

(४) **ॲड. निरंजन डावखरे,** सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ६ जून, २०१७ च्या अधिसूचनेनुसार लिपिक-टंकलेखक गट क, सेवा प्रवेश नियम २०१७ मध्ये बृहन्मुंबई बाहेरील शासकीय कार्यालयामध्ये गट-ड मधील पद धारण करणाऱ्या आणि गट-ड पदावर ३ वर्षांपेक्षा कमी नसलेली नियमित सेवा पूर्ण केलेल्या तसेच विविध शैक्षणिक अहर्ता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता व पात्रतेच्या निकषावर पदोन्नतीची नियुक्ती करता येत असल्याचे नमूद केले असणे, परंतु ठाणे महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०२३ नुसार लिपिक-टंकलेखक पदासाठी पदोन्नतीची अट किमान ५ वर्षांची नियमित सेवा अशी ठेवण्यात येणे, त्यामुळे शासन अधिसूचना २०१७ मधील तरतूदी व महानगरपालिका सेवा नियम २०२३ यामध्ये विसंगती निर्माण झालेली असणे, तसेच ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागातील कार्यरत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची प्रक्रिया सन १९९१ पासून प्रलंबित असणे, वारसांकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असणे, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत

नसणे, ठाणे महानगरपालिकेतील पदोन्नती तसेच अनुकंपाची पदे भरण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(ख) **(मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६, बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ व सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) – (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, श्री. पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, संजय खोडके, डॉ. परिणय फुके, सर्वश्री किशोर दराडे, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, चंद्रकांत रघुवंशी, शिवाजीराव गर्जे, सदाशिव खोत, इद्रिस नायकवडी, दादाराव केचे, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, अमरिशभाई पटेल, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, संजय केणेकर, राजहंस सिंह, संदीप जोशी, ज्ञानेश्वर म्हात्रे, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यात पर्यटन क्षेत्रात खासगी गुंतवणूकीसाठी उत्साहवर्धक आणि अनुकुल वातावरण निर्माण करण्याकरिता 'पर्यटन धोरण-२०२४' जाहिर करण्यात आले असणे, मराठा मिलिटरी लँडस्केप्स संकल्पनेंतर्गत राज्यातील १२ ऐतिहासिक गडकिल्ल्यांचा समावेश युनोस्कोच्या जागतिक वारसा नामांकन यादीत झाल्यामुळे त्यायोगे राज्यातील पर्यटनात वाढ होणार असणे, नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची ऐतिहासिक दस्तावेज असलेली तलवार राज्य शासनाने जवळपास ४७.१५ लाख रुपयांमध्ये लंडनमधून खरेदी करुन राज्यात आणली असणे, १०० वर्षांहून अधिक मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला 'महाराष्ट्र राज्य महोत्सव' म्हणून घोषित करण्यात आले असणे, पर्यटन व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या राज्यातील महिलांकरिता 'आई पर्यटन कर्ज योजना' सुरु करण्यात आली असणे, महिला पर्यटकांसाठी एमटीडीसीच्या रिसॉर्टमध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणे, राज्यातील तीर्थक्षेत्र विकास आराखडयास ३६६१ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असणे, प्रधानमंत्री कुसुम घटक 'ब' योजनेंतर्गत मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेखाली माहे डिसेंबर, २०२५ या एका महिन्यांमध्ये ४५,९११ सौर कृषी पंप बसवून महाराष्ट्राची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली असणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्रयरेषेखालील वीज ग्राहकांसाठी 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रुफ टॉप सोलर योजना' सुरु करण्यात आली असणे, 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना' कार्यान्वित करण्यात आली असणे, पर्यटनदृष्टया राज्य समृध्द होण्यासाठी व त्यातून आर्थिक स्त्रोत निर्माण होण्यासाठी तसेच ऊर्जेच्या क्षेत्रात राज्य स्वयंपूर्ण होऊन शेतकरी चिंतामुक्त होण्यासाठी करण्यात येत असलेली कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ग) **लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६, बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ व सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री. वसंत खंडेलवाल,** डॉ. परिणय फुके, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र हे देशातील एक प्रगत राज्य असून, येथे गेल्या काही दशकांत लोकसंख्येच्या रचनेत मोठया प्रमाणात बदल झाल्याचे दिसून येणे, राज्यातील काही विशिष्ट भागांतील लोकसंख्या वाढीचा दर आणि तेथील स्थलांतरणाचे प्रमाण यामुळे राज्यामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय तसेच सुरक्षा पैलुंच्या अनुषंगाने समस्या निर्माण होऊन, सदर बाबींचा उपलब्ध संसाधनांवर प्रचंड ताण पडत असणे, राज्यामध्ये सध्या विवाह, घटस्फोट, वारसाहक्क आणि दत्तक विधान यांसारख्या वैयक्तिक बाबींसाठी वेगवेगळ्या समुदायांचे वेगवेगळे कायदे अस्तित्वात असणे, या कायदेशीर विविधतेमुळे राज्यामध्ये प्रशासकीय तसेच न्यायिक बाबींमध्ये गुंतागुंत निर्माण होऊन त्याचा जातीय एकता व सामाजिक सलोखा यावर विपरीत परिणाम होत असणे, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ४४ मध्ये राज्यात नागरिकांसाठी 'समान नागरी कायदा' सुनिश्चित करण्याची मार्गदर्शक तत्त्वे लागू करणे आवश्यक असणे, अलीकडेच उत्तराखंड सारख्या राज्याने हा समान नागरी कायदा लागू केलेला असणे, त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्याची अंतर्गत सुरक्षा, सांस्कृतिक अखंडता, सामाजिक ऐक्य आणि सर्वांना समान न्याय मिळण्यासाठी, महाराष्ट्र राज्यामध्ये 'समान नागरी कायदा' लागू करण्याबाबत शासनाची भूमिका व त्याबाबतच्या पुढील उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ व सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (२)] —**

(२) **सर्वश्री प्रविण दरेकर,** प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सदाशिव खोत, संजय केणेकर, सुनिल शिंदे, अमित गोरखे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्ह्यात जलजीवन मिशन योजनेअंतर्गत हजारो कोटी रुपयांचा खर्च करूनही जिल्ह्यातील सुमारे १२५३ गावे व वाड्यांचा संभाव्य पाणीटंचाई कृती आराखड्यात समावेश करण्याची नामुष्की जिल्हा प्रशासनावर आली असणे, रायगड जिल्ह्यात पुरेसा पाऊस पडूनही योग्य नियोजनाअभावी रायगड जिल्ह्याला दरवर्षी पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असणे, जिल्ह्यातील नद्यांवर पुरेशी धरणे

धरणे नसल्याने पावसाचे पाणी थेट समुद्राला जाऊन मिळत असणे, जलजीवन मिशनअंतर्गत जिल्ह्यात १४२२ योजनांची कामे हाती घेण्यात आली असून ही कामे माहे डिसेंबर, २०२३ अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असणे, विहित मुदतीत कामे पूर्ण न झाल्याने अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी ठेकेदारांना दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली असणे, मुदतवाढ देऊन देखील अद्याप ही कामे पूर्ण झालेली नसणे, परिणामी, या गावांना आगामी काळातही टंचाईचा सामना करावा लागणार असणे, दोषपूर्ण नियोजन करणारे अधिकारी आणि मुदतीत कामे पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (३) व (४)]** —

**(३)** **श्री.राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्हा नियोजन समितीमार्फत स्वतंत्र उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या जात असून त्यासाठी निधीची तरतूद करण्यात येणे, तथापि, विमुक्त व भटक्या जमाती (VJNT) या सामाजिकदृष्ट्या अत्यंत मागास व वंचित घटकांसाठी अशा प्रकारची ठोस व संरचित उपाययोजना अद्याप अस्तित्वात नसणे, परिणामी, या समाजाच्या शिक्षण, आरोग्य, निवास, रोजगार व मूलभूत सुविधांच्या गरजा पुरेशा प्रमाणात पूर्ण होत नसणे, विमुक्त व भटक्या जमातींची राज्यातील लक्षणीय लोकसंख्या लक्षात घेता, त्यांच्यासाठीही अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती उपाययोजनांच्या धर्तीवर जिल्हा नियोजन समिती अंतर्गत स्वतंत्र उपाययोजना सुरू करणे अत्यावश्यक असून यामुळे निधीचे समतोल व न्याय्य वाटप होऊन या समाजाचा सर्वांगीण विकास साधणे शक्य होणार असणे, त्यासाठी, या बाबीचा सखोल अभ्यास करून आवश्यक शिफारशी करण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती गठीत करण्यात यावी, तसेच लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री सदाशिव खोत,** प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पशुसंवर्धन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गोवंश हत्या बंदी कायद्यामध्ये बदल होणे आवश्यक असणे, पेठ वडगाव (जि.कोल्हापूर) येथील पशु बाजारातून व्यापारी, म्हशी घेऊन सोलापूरच्या बाजाराकडे वाहतूक करत असताना मंगळवेढा येथे काही तथाकथित गोरक्षकांनी गाडी अडवणे, गाडीतील व्यापारी व चालकाला अमानुष मारहाण करून त्यांची

लूटमार करणे, संबंधित गोरक्षकांनी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केल्यामुळे उलट शेतकरी व व्यापाऱ्यांवरच गुन्हे दाखल करण्यात येणे, प्रत्यक्षात गोवंश हत्या बंदी अंतर्गत म्हशीचा समावेश होत नाही, तरीही पोलीस प्रशासनाकडून शेतकरी व व्यापाऱ्यांवर चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल करणे, व्यापाऱ्यांच्या म्हशी गोशाळेमध्ये नेऊन दाखल करणे, जनावरे एका बाजारातून दुसऱ्या बाजारात नेत असताना तथाकथित गोरक्षक गाड्या अडवून मारहाण करणे, धमकावणे लूटमार करणे असे प्रकार वाढत असणे, यामुळे दुग्ध व्यवसाय देखील अडचणीत येणे, शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागणे, याचा पशुधन खरेदी-विक्रीवर परिणाम होत असून जनावरांना योग्य दर मिळणे कठीण झालेले असणे, पोलीस प्रशासनाने कायद्याचा चुकीचा अर्थ लावून शेतकरी व व्यापाऱ्यांवर दाखल केलेले गुन्हे मागे न घेणे, इतर जनावरांच्या वाहतुकीबाबत कायद्याची योग्य अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देणे, गोवंश हत्या बंदी कायद्यामुळे राज्यात संभ्रम वाढत चालल्यामुळे शेतकरी व पशुधन व्यापारावर गंभीर परिणाम होत असल्याने सदर कायद्यात बदल करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(क) अल्प सूचना प्रश्न**

"राज्यातील शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्याकरिता दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत" या विषयावरील श्री.संजय खोडके, वि.प.स. यांचा अल्प सूचना प्रश्न क्रमांक ८६३३.

**(ख)** शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.सदाशिव खोत व इतर वि.प.स. यांचा "बीड जिल्ह्यासह राज्यातील शेतकऱ्यांना प्रती थेंब अधिक पीक योजनेंतर्गत अनुदान वितरीत करण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ७७००.

**(ग)** तारांकित प्रश्न

**दोन : शोक प्रस्ताव :-**

"श्री.दत्तात्रय राघोबाजी मेघे, माजी वि.प.स. व माजी मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव."

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) मुख्यमंत्री** : **(क)** "दिनांक १३ मे, २०२४ रोजी घाटकोपर येथील बेकायदेशीर फलक कोसळल्यामुळे झालेल्या दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी श्री.दिलीप बी. भोसले, माजी मुख्य न्यायाधीश, अलाहाबाद उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय चौकशी समितीचा अहवाल " सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) अधिनियम, २०१८ च्या कलम ४६ च्या पोट-कलम (३) मधील तरतूदीनुसार "श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) नियम, २०२५" प्रसिध्द करण्याची अधिसूचना क्रमांक श.दे.वि-२२२५/प्र.क्र.१५०/कार्य-१६, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : **(क)** "निकमार विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "डीईएस विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "विजयभूमी विद्यापीठ, रायगड यांचे सन २०१९-२०२० ते सन २०२४-२०२५ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) वने मंत्री** : "चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी वन विभागातील लोहारडोंगरी येथील लोहखनिज खाणीला राज्याच्या वन्यजीव मंडळाने दिलेल्या परवानगीस तातडीने स्थगिती देण्याबाबत." या विषयाबाबत श्री.मिलिंद नार्वेकर व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक ४५९ वरील चर्चेच्यावेळी दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी

दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(४) **महिला व बाल विकास मंत्री** : **(क)** "महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(५) **मदत व पुनर्वसन मंत्री** : "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपिटीबाबत" या विषयावरील श्री.अनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिनांक ०७ एप्रिल, २०१५ रोजी उपस्थित केलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(६) **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजीचा श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांच्या " पिंप्रद ता.फलटण, जि.सातारा या गावात छुप्या पध्दतीने सुरू असलेले गर्भलिंग निदान चाचणी" या विषयावरील म.वि.प. नियम २८९ अन्वये प्रस्तावावरील निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**चार** : (१) **श्री. प्रसाद लाड, मा.समिती प्रमुख, विधानपरिषद विशेषाधिकार समिती यांचा प्रस्तावः-**

"सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. श्रीकांत भारतीय व श्री. प्रविण दरेकर यांनी श्री. सुर्यकांत हौसराव मोरे, मु.पो. रत्नापूर, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) यांच्याविरूध्द दिनांक २४ नोव्हेंबर, २०२५ रोजी उपस्थित केलेल्या विशेषाधिकारभंग व अवमानाच्या प्रकरणासंदर्भातील विधानपरिषद विशेषाधिकार समितीचा अहवाल विचारात घेण्यात यावा."

(२) **मा.मुख्यमंत्री यांचा प्रस्तावः-**

सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. श्रीकांत भारतीय व श्री. प्रविण दरेकर यांनी श्री. सुर्यकांत हौसराव मोरे, मु.पो. रत्नापूर, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर,

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्याविरूध्द दिनांक २४ नोव्हेंबर, २०२५ रोजी उपस्थित केलेल्या विशेषाधिकारभंग व अवमानाच्या प्रकरणासंदर्भातील विधानपरिषद विशेषाधिकार समितीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर हे सभागृह सदरहू अहवालातील निष्कर्षांशी सहमत असून असा ठराव करीत आहे की,

प्रस्तुत प्रकरणी श्री सुर्यकांत हौसराव मोरे यांनी विधानपरिषद सभागृह विधानपरिषदेचे मा. सभापती, विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य तसेच गतकाळात विधानपरिषदेत कामकाज केलेले विधानपरिषदेचे आजी व माजी सदस्य व तत्कालीन मुख्यमंत्री राहिलेल्या माजी सदस्यांनी कर्तव्य बजावलेल्या सार्वभौम सभागृहाविषयी अत्यंत आक्षेपार्ह शब्दप्रयोग करुन घोर अपमान करीत तसेच विधानपरिषदेचे मा.सभापती यांच्या सर्वोच्च स्थानाचा अवमान करुन एकूणच विधानपरिषद या संस्थेबद्दल द्वेष व उपहासाची भावना निर्माण होऊन जनमानसाचा विधानपरिषद या घटनात्मक संस्थेवरील विश्वास उडेल असे गर्हणीय कृत्य करुन विधानपरिषदेचा अवमान व विशेषाधिकार भंग केल्याने श्री.सुर्यकांत हौसराव मोरे, मु.पो.रत्नापूर, ता.जामखेड, जि. अहिल्यानगर यांना ३० दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिक्षा देण्यात यावी अशी शिफारस विधानपरिषद विशेषाधिकार समिती करीत आहे.

कारावासात पाठविलेल्या व्यक्तीस विधानमंडळाचे अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर मुक्त केले जाते ही वस्तुस्थिती विचारात घेता समिती अशीही शिफारस करते की, विधानमंडळाचे अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वी संबंधित अवमानकर्ते यांची लगेच मुक्तता होऊन आवश्यक तेवढा त्यांच्या शिक्षेचा कालावधी पूर्ण न झाल्यास विधानपरिषदेच्या एका किंवा अधिक अधिवेशनात त्यांना देण्यात आलेल्या शिक्षेचा एकूण कालावधी पूर्ण होईपर्यंत पुढील अधिवेशनात त्यांना पुन्हा कारागृहात पाठविण्यात यावे.

**पाच : "अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करणे"**

**सहा : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ व सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) (अनुक्रमांक १):-**

**(१) श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ११ वर उद्योग मंत्री निवेदन करतील :-**

देहु जवळील संत तुकोबाची साधनाभूमी श्रीक्षेत्र भंडारा, घोराडा आणि भामचंद्र डोंगर भूमाफिया, विकासक व एमआयडीसीच्या अतिक्रमणातून

सोडविण्याकरीता वारकरी व शेतकऱ्यांच्या आझाद मैदान (मुंबई) येथे सुरु असलेल्या आंदोलनाबाबत.

**(सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) (अनुक्रमांक २ ते ५):-**

**(२) श्री.सत्यजित तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५४ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील विविध ग्रामपंचायतींच्या 'सीआरएस' (CRS) पोर्टलचे पासवर्ड हॅक करून करण्यात आलेल्या हजारो बोगस जन्म नोंदी आणि त्यातून निर्माण झालेला राष्ट्रीय सुरक्षेचा गंभीर प्रश्न.

**(३) श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६२ वर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील ६ विद्यापीठांतर्गत ४१ एम. फील. पदवी प्राप्त अध्यापकांवरील अन्यायाबाबत.

**(४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४९ वर कामगार मंत्री निवेदन करतील :-**

सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील शिरवळ येथील चोरडिया इंडस्ट्रियल पार्कमधील इनोस्कपा इंडिया प्रा.लि. या कंपनीत कामगांरावर अन्याय होत असल्याबाबत.

**(५) ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५७ वर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

भंडारा येथील स्वतंत्र महिला जिल्हा रुग्णालयाच्या साहित्य खरेदी प्रकरणात प्रचंड घोळ झालेला असल्यामुळे याची उच्चस्तरीय चौकशी करणेबाबत.

**(६) श्री.सत्यजित तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६३ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील वकिलांवरील वाढते हल्ले आणि केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून 'वकील संरक्षण कायदा' महाराष्ट्रात लागू करण्याबाबत.

(७) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६७ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

सासवड तालुका पुरंदर येथील गट क्र. ३०१ क्षेत्रफळ ३ हेक्टर १९ आर जमीन ऐतिहासिक ‘श्री भैरवदेव देवस्थान ट्रस्ट’ यांच्या मालकाची असून ही जमीन तात्काळ देवस्थान ट्रस्टच्या ताब्यात देऊन बेकायदेशीर ताबा हटविण्याबाबत.

(८) **श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६६ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

विनाअनुदानित शाळांना टप्पा अनुदान नियमबाह्य पद्धतीने नाकारल्याबाबत.

(९) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५९ वर उद्योग मंत्री निवेदन करतील :-**

राज्यात वर्षानुवर्षे उद्योगासाठी वापरात न आलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत.

(१०) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६० वर उद्योग मंत्री निवेदन करतील :-**

भोर (जि.पुणे) तालुका हक्काचे औद्योगिक क्षेत्र पुन्हा औद्योगिक वसाहतीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावे तसेच संबंधित भूखंडाची होत असलेली विक्री तात्काळ थांबविण्याबाबत.

**सात : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (गृहनिर्माण)** लक्ष वेधतील :-

"भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने विविध वसाहतींमध्ये नागरिकांना जीवनावश्यक वस्तू उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने पिठाची गिरणी, स्टोअर्स, सायकल दुरुस्ती, बिस्कीट स्टॉल तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंची दुकाने यांसाठी ११ महिन्यांच्या लिव्ह अँड लायसन्स तत्त्वावर भूखंड वितरित केलेले असणे, या माध्यमातून अनेक लहान व्यावसायिकांना रोजगार उपलब्ध झाला असून स्थानिक नागरिकांनाही आवश्यक सेवा सहज उपलब्ध होत असणे, तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या दिनांक १९ सप्टेंबर १९९१ रोजीच्या ठराव क्र. १९५७ नुसार, जीवनावश्यक वस्तूंशी संबंधित व्यवसाय करणाऱ्या भूखंडधारकांना दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्यावर भूखंड देताना दरामध्ये सवलत देण्याचा तसेच संबंधित बाबींचा विचार करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असणे, परंतु संबंधित भूखंडधारकांना अद्याप दीर्घ मुदतीची लीज न मिळाल्यामुळे तसेच लिव्ह अँड लायसन्सचा

कालावधी केवळ ११ महिन्यांचा असल्याने त्यांच्या व्यवसायाच्या सातत्यावर परिणाम होत असणे, यासंदर्भात मुंबई गृहनिर्माण मंडळाने दिनांक २६ नोव्हेंबर २००९ रोजी ठराव क्र. २५७/२६४९ द्वारे या भूखंडांचे दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्यावर रूपांतर करण्याचा निर्णय घेऊन विषय पुढील मंजुरीसाठी प्राधिकरणाकडे पाठविलेला असणे, मात्र अनेक वर्षे उलटूनही या निर्णयाबाबत अंतिम कार्यवाही झालेली नसल्यामुळे संबंधित लिव्ह अँड लायसन्स धारकांमध्ये अनिश्चितता व अस्वस्थता निर्माण झालेली असणे, त्या अनुषंगाने संबंधित लिव्ह अँड लायसन्स धारकांना दीर्घ मुदतीची लीज देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांकरीता स्थापन करण्यात आलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.महाड, जिल्हा रायगड या विद्यापीठातील अनागोंदी कारभार, कुलगुरुंची अकार्यक्षमता, मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता झाली असणे, तसेच सन २०२४ मध्ये या विद्यापीठाची स्थापना झाल्यापासून तंत्रशिक्षणाशी संबंधित सर्व महाविद्यालयांना या विद्यापीठाची संलग्नता घेणे कायद्याने बंधनकारक असताना संबंधित तंत्रशिक्षण महाविद्यालयांना अजिबात सहकार्य न मिळणे, विद्यार्थी नोंदणी बाबत विद्यापीठाचे कोणतेही नियोजन नसणे, परिक्षांचे वेळापत्रक संपूर्णत: कोलमडणे, विद्यार्थ्यांना गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र मिळण्याकरीता थातुर-मातूर उत्तरे देऊन सारखे खेपा घालायला लावणे, परिक्षांचे निकाल विहीत मुदतीत जाहीर न करणे, यामुळे अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित असणे, अशा सर्व प्रकारांमुळे या विद्यापीठाची पर्यायाने महाराष्ट्र राज्याची तंत्रशिक्षणात देशपातळीवर प्रतिमा मलीन होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री पंकज भुजबळ,** अमोल मिटकरी, इद्रिस नायकवडी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नाशिक शहराच्या वाहतूक समस्येवर उपाय म्हणून प्रस्तावित सुमारे ६६ कि.मी. लांबीच्या नाशिक बाह्य रिंग रोडसाठी निश्चित करण्यात आलेल्या सध्याच्या अलाइनमेंटमुळे नाशिक, सिन्नर व त्र्यंबकेश्वर तालुक्यातील कसमादे पट्ट्यातील व इतर बागायती क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर सुपीक जमीन संपादित होणार असणे, या भागात द्राक्षे, भाजीपाला व इतर नगदी पिकांची लागवड असून सदर प्रकल्पामुळे अनेक अल्पभूधारक शेतकरी भूमिहीन होण्याची गंभीर शक्यता असणे, सदर अलाइनमेंट सुपीक जमिनीऐवजी पडीक अथवा डोंगराळ भागातून नेण्याबाबत शेतकऱ्यांनी वारंवार मागणी केली असतानाही प्रशासन जुन्याच

आराखड्यावर ठाम असणे, शेतकऱ्यांशी कोणतीही सखोल चर्चा किंवा संमती न घेता भूसंपादनाच्या नोटिसा दिल्या जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये निर्माण होत असलेले असंतोषाचे वातावरण, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री किरण सरनाईक, ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अंशतः अनुदानित ३२६१, ३३५१, ३३७९, ०५११ लेखाशीर्षाचे वेतन सतत अनियमित होत असणे, ही लेखाशीर्ष सर्व प्लॅनमध्ये असल्यामुळे नियमित निधी उपलब्ध होत नसणे, ३२६१, ३३५१, ३३७९, ०५११ या लेखाशीर्षांना जेवढे टक्के अनुदान दिलेले आहे तेवढा निधी नियमितपणे दरमहा उपलब्ध होत नसणे, परिणामी वेतन अनियमित होत असणे, वरील लेखाशीर्ष अंतर्गत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या तुकड्यांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक अनियमितता तसेच नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागणे, ३२६१, ३३५१, ३३७९, ०५११ या लेखाशीर्षांना जेवढे टक्के अनुदान दिलेले आहे तेवढा निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असणे, अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित होत नसल्यामुळे मुलाबाळांचे शिक्षण, कर्ज हप्ते, कौटुंबिक गरजा इत्यादी पूर्ण होत नसणे, त्यामुळे या कर्मचाऱ्यांचे कौटुंबिक जीवन विस्कळीत होत असणे, अंशतः अनुदानित कर्मचाऱ्यांचे निधी अभावी वेतन नियमित होत नसल्यामुळे त्याचा परिणाम अध्ययन-अध्यापनावर होत असल्याने गुणवत्ता खालावण्याची शक्यता असणे, त्यामुळे अंशतः अनुदानित कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करण्याची गरज असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**आठ : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**नऊ : शासकीय विधेयके —**

**(क) पुरःस्थापनार्थ :-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ — महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

**(ख) विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

(१) सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ — भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ — भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**(२)** सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ — महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

**(ग) विधानसभेने संमत केल्यास — विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

---------------------------------------------------------------------------

**दहा** : **"निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप"**

**अकरा** : **श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री. शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. यांचा नियम २५९ अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, पोलीस प्रशासनावरील शासनाचे सुटलेले नियंत्रण, भोंदू बाबा अशोक खरात यांचे कारनामे, राज्यात लहान बालकांच्या अपहरणात व बलात्कारात झालेली वाढ, राज्यातील महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांमुळे महिला वर्गात पसरलेले भितीचे वातावरण, या घटनांना आळा घालणारा व महिलांना कायदेशीर संरक्षण देणारा शक्ती कायदा अद्याप प्रतीक्षेत असणे, मुंबईत बंद पडलेल्या कारखान्यातील कामगारांच्या घरांचा प्रश्न व कामगार बेघर झाल्याने करावयाची उपाययोजना, बांधकाम कामगार यांचे बोगस नोंदणी रॅकेट उघडकीस येवून करोडो रुपयाचा गैरव्यवहार करणे, तसेच कामगार अधिकारी यांच्याकडून अधिकाराचा गैरवापर करुन चुकीचे निर्णय घेण्यात येणे, राज्यातील शासन निधीअंतर्गत व महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत कामे कंत्राटदारांना उपवर्ग करताना कोट्यवधी रुपयांची अनियमितता होणे, राज्यातील विविध महामंडळाची घोषणा होवूनही निधी अभावी बंद पडण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने जनतेच्या

भावना व संताप तीव्र होणे, बंगलोर येथील विहान डायरेक्ट सेलिंग बंगलोर (क्यनेट) या कंपनीकडून कर्ज घेतलेल्या महिलांची लाखों रुपयांची झालेली फसवणूक, राज्यातील विविध शासकीय विभागांमध्ये वाढत चाललेल्या गैरव्यवहाराच्या घटनांमुळे प्रशासनावरील जनतेचा विश्वास ढासळत असणे, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मोठया प्रमाणावर अनियमितता होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत असणे, विविध खात्यातील बदल्या व बढत्या यामध्ये होत असलेली अनियमितता व गैरव्यवहार, अनेक प्रकरणांमध्ये गैरव्यवहार उघडकीस येऊनही दोषी अधिका-यांवर कठोर कारवाई होत नसणे, या गैरव्यवहाराच्या घटनांची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही "

**बारा** : **सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, सर्वश्री सतिश चव्हाण, सदाशिव खोत, श्रीमती भावना गवळी, श्री. पंकज भुजबळ, डॉ. परिणय फुके, सर्वश्री कृपाल तुमाने, संजय खोडके, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री किशोर दराडे, अमोल मिटकरी, अमरिशभाई पटेल, चंद्रकांत रघुवंशी, शिवाजीराव गर्जे, श्रीकांत भारतीय, इद्रिस नायकवडी, अमित गोरखे, किरण सरनाईक, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री दादाराव केचे, रणजितसिंह मोहिते-पाटील, विक्रांत पाटील, योगेश टिळेकर, राजहंस सिंह, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, वसंत खंडेलवाल, संजय केणेकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, संदीप जोशी, **वि.प.स. यांचा म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील जनता निरोगी रहावी व तिचे आरोग्य सदृढ रहावे यासाठी प्रत्येक नागरिकाला 'आरोग्यम सुखसंपदा' उपलब्ध व्हावी याकरिता राज्य शासनाने "आयुष्यमान भारत योजना","महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना","राजीव गांधी जीवनदायी योजना" इत्यादी योजनांच्या माध्यमातून राज्यातील जनतेला जलद, पारदर्शक व रुग्णस्नेही उपचार मिळण्यासाठी प्रयत्न केले असणे, राज्यातील सर्व जिल्हयांसाठी आणि शहरांसाठी वातावरणीय कृती आराखडे तयार करण्याचे प्रयोजन असणे, त्याकरिता वातावरणीय कृती कक्ष स्थापन करण्यात येणे, राज्य प्रदूषण मुक्त करण्याकरिता विद्युत वाहन धोरण जाहिर करुन विद्युत वाहनधारकांना टोलमुक्त करण्यात येणे, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स गठीत करण्यात येणे, 'माझी वसुंधरा अभियान' राबविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय विभागाकडून देवराई फाऊंडेशन, पुणे सोबत सामंजस्य करार करण्यात येणे, या कराराद्वारे प्रत्येक तालुक्यात किमान १ मानवनिर्मित देवराई व घनवन तयार करण्यात येणे, मुंबईत १२ डब्यांच्या लोकलऐवजी १५ डब्यांच्या लोकल सुरु करण्याचे प्रस्तावित असणे, पालघर जिल्हयात औद्योगिक टाऊनशीपच्या माध्यमातून चौथी मुंबई संकल्पना राबविण्याचे प्रस्तावित असणे, पर्यावरणपूरक विकास योजनेच्या माध्यमातून सन २०५० पर्यंत कार्बन कमी करण्याचे नियोजन असणे, सन २०२५-२०३० साठी शहराचा विकास आराखडा तयार करण्यात येणे, या माध्यमातून ट्रॅफिक कमी करणे,

हरितक्षेत्र वाढविणे, कनेक्टीव्हीटी देणे, स्वस्त गृहनिर्माण योजना राबविणे इ. प्रयत्न असणे, राज्य प्रदूषण मुक्त करण्याचा प्रयत्न आणि मुंबईकरांना सुखकर प्रवास, खड्डेमुक्त व प्रदूषणमुक्त मुंबई इत्यादीसाठी वाहतुकीचे विविध पर्याय उपलब्ध करण्याकरिता व मुंबईतील लोकसंख्या नियंत्रित करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**तेरा : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकासासाठी सामंजस्य करार करण्यात आल्याबाबत" या विषयावरील श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांचा दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक २९ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक ३०६४ ला दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **सर्वश्री विक्रम काळे, अमोल मिटकरी, शिवाजीराव गर्जे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील कृषी विद्यापिठांमधील रिक्त पदे भरण्याबाबत" या विषयावरील श्री.शिवाजीराव गर्जे व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५१४८ ला दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २३ मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले**,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.